# मी सुमित्रा

मी-सुमित्रा-(जन्म १२ डिसेंबर १९२२)

मी सुमित्रा शंकर देवधर - माहेरची येसू गजानन नेने - शंकरराव देवधरांची धर्मपत्नी, सुलभा-सुभाष-प्रतिभा या मुलांची आई. रेखा माझी सून आणि गोविंदराव आणि किरण माझे जावई. शिवाय माझे सगळे नातू, नाती, नातसुना, पंतवंडं या सगळ्यांची नावं माझ्या पक्की लक्षात आहेत बरं का. याखेरीज कुणाची वहिनी, काकू, मामी, मावशी, आत्याबाई अगदी खापरपणजीसुद्धा या रक्ताच्या नात्यांबरोबर कित्येक जोडलेल्या नात्यांचाही पूरेपूर आनंद घेऊन मी कृतार्थ आहे. वयाची शंभरी पार केलेली एकच व्यक्ती मी आजवर माझ्या आयुष्यात पाहिली होती ती म्हणजे आमचे हेडगुरूजी, आठवले मास्तर. त्यांना भेटायला मी गेले होते. ते बोलू शकत नव्हते, नुसता हात करून हसले. ओळखलं की नाही तेही कळलं नाही. त्यांच्या दीर्घायुष्याचं रहस्य त्यांच्या तोंडून लोकांना ऐकायला हवं होतं पण ते शक्य नव्हतं.

आज मला स्वतःलाच शंभर वर्षं पुरी झाली. शंभर उन्हाळे-पावसाळे-हिवाळे मी बघितले आणि इथपर्यंत मी पोचले याचं मलाच आश्चर्य वाटतंय. या शंभर वर्षातल्या आठवणींचं एक प्रचंड गाठोडं माझ्याकडे आहे. दिवसभरात अनेक वेळा मी ते सोडते आणि त्या आठवणी कुरवाळते. त्या कुणालातरी सांगत राहावं असं मला सारखं वाटतं पण माझ्याइतक्याच जुन्या पुराण्या असलेल्या आठवणीत इतरांना रस कसा वाटणार! पण या क्षणी कदाचित् माझी शंभर वर्षांची कथा ऐकण्याची थोडीशी तरी उत्सुकता तुम्हाला असेल असं मला वाटतं. म्हणून सांगते - सुचेल तसं सांगते.

माझे आईवडील खेड्यातले. वडील प्राथमिक शिक्षक. मला त्यांनी फायनलपर्यंत शिकवलं आणि वयाच्या १७व्या वर्षी लग्न करून दिलं. खेड्यातून मी मुंबईला आले अहमदसेलरच्या चाळीत. सासर म्हणजे फक्त ' हे '. अण्णा म्हणायचे त्यांना. घरात आम्ही दोघंच. मी पुढे शिकावं म्हणून ' ह्यांनी ' मला शाळेत घातलं. पण अभ्यासात मला फारशी गोडी नव्हती ते त्यांनी ओळखलं आणि माझी शिवणकामाची आवड बघून मला तो कोर्स करायला प्रोत्साहन दिलं. आणि नंतर मला कसं जमेल, कसं जमेल असं म्हणता म्हणता म्युनिसिपालिटीत स्पेशल शिक्षक म्हणून नोकरी करण्यात कधी रूळले आणि निवृत्त झाले ते कळलंच नाही. सुलभाचा जन्म आधीच झाला होता, नोकरीत असतानाच सुभाष-प्रतिभाचा जन्म झाला, शाळा, स्वयंपाक, मुलांचं करताना तारांबळ उडायची. पण कामाचं मला कधीच वाटलं नाही. मुख्य म्हणजे मला त्या काळात बायकांना दुर्मिळ असलेलं स्वातंत्र्य होतं. सासूसासऱ्यांचा जाच नव्हता, नवऱ्याची अरेरावी तर नव्हतीच आणि तसे गरीबीचे चटकेही नव्हते.

आजुबाजुला बघून मला ते तेव्हाही जाणवायचं. मुलंही गुणी आणि हुशार निघाली. हे मला नेहमी म्हणायचे, "तू नशिबवान आहेस तुला कसलीच चिंता नाहीये." आणि खरंच मला मुलांच्या भविष्याची, आमचं पुढे कसं होईल याची चिंता नव्हती. ह्यांच्या इच्छेप्रमाणे सुलभा प्रोफेसर, सुभाष इंजिनीअर आणि प्रतिभा डॉक्टर झाली, तिघांचीही लग्न झाली. सुभाष-प्रतिभा परदेशात पण सुलभा मात्र बरीच वर्षं माझ्या जवळपासच राहिली.

बारीक सारिक आजारपणं, किरकोळ सांसारिक अडचणी सोडल्या तर मी नाकासमोरचं सरळ आयुष्य जगत होते कारण कुठल्याही अडचणीला सामोरं जायला अण्णा समर्थ होते. त्यानंतर माझ्या आयुष्यात पहिली मोठी उलथापालथ झाली ती १९८६ साली जेव्हा अण्णांचं हार्नियाचं ऑपरेशन होऊन त्यांनी अंथरूण धरलं तेव्हा. दुखण्यामुळे त्यांचं सततचं विव्हळणं, डॉक्टरांचे हरलेले उपाय यामुळे आम्ही सर्वचजण जेरीला आलो. खूप खटपट करून सुभाषने आम्हाला इकडे बोलवून घेतलं आणि अखेरीस त्यांच्या इच्छेप्रमाणे मुलाजवळ त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते फार मोठं रामायण आहे-ज्यातले सर्व प्रसंग मी अजूनही विसरलेली नाही.

अण्णांच्या आजारपणात मला एक खूप महत्वाची गोष्ट जाणवली ती म्हणजे आम्ही आजवर जोडलेली माणसं. माझे आणि अण्णांचे सर्व नातेवाईक, आम्हा दोघांचा मित्रपरिवार, शाळेतले सहकारी, मुख्य म्हणजे आमचे शेजारी. या सर्वांनी आम्हाला जी काही निरपेक्ष मदत केली त्याला तोड नाही. ही मदत सुद्धा आपणहून न मागता केलेली.

तसे आमचे नातेवाईक भरपूर. माझ्या भावांनी आणि वहिन्यांनी मात्र मला सदैव साथ दिली. माझ्या भावा-बहिणींची मुलंसुद्धा माझ्या अजूनही संपर्कात आहेत.

माझे दीर अण्णांपेक्षा खूप मोठे त्यामुळे पुतण्या, पुतणे, त्यांची मुलं हीच मला जवळची. हाक मारायची देखील गरज नाही - त्याआधीच वेळेला हजर व्हायची.

आमचं घर -घर कसलं- चाळीतली एक खोली. पण जागा लहान म्हणून आम्हाला कुणाची अडचण वाटली नाही आणि येणारालाही ती लहान वाटली नाही. दार सदैव उघडंच असायचं. अण्णा हे सार्वजनिक अण्णा होते. सतराशे साठ कामांसाठी ओळखीचे तसंच अनोळखी लोक त्यांच्याकडे यायचे - राजकारण म्हणू नका, ज्योतिष म्हणू नका, होमिओपॅथी, महायोग मंडळ, वक्तृत्व सभा, देवधर मंडळ, नवरात्र मंडळ असेल नाहीतर शाळेचं काहीतरी काम घेऊन आलेले लोक. त्यांची कामं, माझी घरातली कामं, मध्ये चहापाणी सगळं एकाच वेळी चालायचं.

अण्णा अनेक संस्थांचे कार्यकर्ते. त्यांच्या मीटींगा, माझ्या, मुलांच्या मित्रमैत्रिणी आमच्या एवढ्याशा घरात आरामात व्हायच्या.

आम्हा दोघांच्या शाळा वेगवेगळ्या होत्या. मी स्पेशल टीचर असल्यामुळे रोज दोन-तीन शाळांतून जात असे. शाळेत कुणाची पार्टी असली असली की त्यासाठी आम्ही शाळेतच खाद्यपदार्थ तयार करीत असू. ते काम मला आवडायचं.

अण्णांना ट्रिपा काढायचा फार शौक. मग ती देवधर मंडळाची असो, शाळेतली असो की मित्रांबरोबर. मलाही ते खूप आवडायचं. दर मे महिन्यात कुठेतरी बिऱ्हाड करून राहायचा उपक्रम तर आम्ही अनेक वर्षं करीत होतो.

अहमद सेलर-ते तर माझं सासर आणि माहेरदेखील. गेली ३५ वर्षं मी इथे अमेरिकेत राहत्ये पण सगळी म्हणतात की हिचा जीव अजून अहमद सेलरमध्ये आहे. आणि ते खरंच आहे. सगळ्यांची मला खूप आठवण येते. त्यांचे चेहरे डोळ्यासमोर येतात. तिथलं कुणी भेटलं की मला त्यांच्याजवळ किती बोलू असं होतं. दारं उघडी असलेल्या सगळ्या खोल्या, तिथल्या जागवलेल्या मंगळागौरी, एकत्र केलेला स्वयंपाक, गच्चीतली वाळवणं आणि कोजागिरी सगळं सगळं आठवतं. रात्री जेवणं झाली की गॅलरीत आम्ही बायका गप्पा मारत बसायचो. सगळ्याचे पाहुणे, नातेवाईक सगळ्यांना माहिती असायचे. बाहेर जाताना घराच्या किल्ल्या कुणाकडे तरी सोपवून जायची पद्धत होती. सणवार, पापड, कुर्डया तर एकत्र व्हायच्या आणि एखाद्याच्या घरातली दुःखद घटना सगळ्यांना दुःखात लोटायची.

मी अमेरिकेला आल्यावर आमच्या घराची किल्ली शेजारीच असायची. ज्यांना हवी ते खोली वापरायचे. किल्ली आहे म्हणून कोणी खोली बळकावेल अशी भीती मला कधीच वाटली नाही.

लग्नाआधी १७ वर्षं माहेरी त्यानंतरची ४८ वर्षं अण्णांबरोबर संसार केला आणि आता गेली ३५ वर्षं मी अमेरिकेत आहे. आता मात्र इथेच फारतर विनायक-उदयन या नातवांकडे आणि प्रतिभाकडे एवढाच माझा प्रवास. गिरिजा-प्राजक्ता माझ्या लाडक्या नातसुना आहेत, खूप काळजी घेतात माझी.

अहमद सेलर, माझी शाळा, मुंबई, तसंच माझं माहेर इथल्या माझ्या आठवणी खूप आहेत, जशा मला आठवत गेल्या तशा मी त्या लिहिल्याही आहेत, त्यांचं एक मोठ्ठं बाडच आहे माझ्याकडे. पण माझ्याशिवाय आणखी कोण ते वाचणार? मीच बापडी ते अनेक वेळा वाचत बसते. आता ऐकू अजिबात येत नाही, त्यामुळे संवाद तुटलाय. पण वाचता येतंय, लिहिता येतंय, बोलता येतंय हेही काही कमी नाही. घरी येणारी सगळी माणसं मला भेटून जातात, दोन शब्द बोलतात. गेली काही वर्षं

कामही करायला जमत नाही. मग वेळ कसा घालवायचा असा प्रश्न मला पडतो. मग काय डोक्यात आठवणींचं मोहोळच उठतं. कधी कुणाचं तरी नाव एकदम समोर येतं. त्याच्याबद्दल काहीबाही आठवतं. एवढं मात्र खरं की नाव एक आणि आठवण दुसऱ्याची असा गोंधळ अजूनतरी होत नाही असं मला वाटतं.

सगळ्यांना प्रश्न पडतोय की मग मी इतकी जगले तरी कशी? माझ्या वयाची शंभर वर्षं पुरी झाली असं ऐकल्यावर कुणाच्याही भुवया वर जातात आणि " अरे वा! किती छान, भाग्यवान आहात, कसं काय जमलं हे ? तुमच्या या दीर्घायुष्याचं रहस्य तरी काय? "

खरं सांगू ! सत्तर -पंचाहत्तर फारतर ऐंशी वर्षं ती सुद्धा माझ्या आजीकडून मला वारसाहक्काने मिळाली असती तर. पण त्याच्या पुढली वर्षं? ती मला अमेरिकेतल्या वास्तव्याची देणगी म्हणून मिळालेली आहेत. १९८७ साली आम्ही दोघं इथे आल्यावर पहिल्या तीन महिन्याच्या आत 'हे' गेले. त्यानंतर २०११ सालापर्यंत अधून मधून भारतात जात होते, सर्वांच्या भेटीगाठी होत होत्या. पण त्यानंतर मी इथेच-माझ्या खोलीत-एखाद्या राणीसारखी राहत्ये. माझी सर्वतोपरी काळजी घेण्याचं काम रेखा-सुभाष इतक्या निगुतीने करतात की अनेक वेळा त्याबद्दल मला ओशाळवाणं वाटतं. पण आता माझंही शरीर थकलंय, मी पूर्णपणे परावलंबी झाल्ये. मला मधुमेह, रक्तदाब अशा अनेक व्याधी आहेत. माझी अनेक ऑपरेशन्स झाल्येत, पडापडी झाल्ये. मला अनेकदा डॉक्टरकडे न्यावं लागतं. खूप औषधंही घ्यावी लागतात. या सगळ्याची जबाबदारी घेऊन मला चालतं बोलतं ठेवण्याचं काम ही दोघं गेली कित्येक वर्षं कुठलीही तक्रार न करता मनापासून करताहेत. त्यांचीही वयं आता कमी नाहीत. त्यांची मुलं-नातवंडं यांना भेटायला जाणं माझ्यामुळे अवघड होऊन बसलंय. मला सगळं कळतंय पण तरी मी आपली जगतेच आहे. कुठलाही कार्यक्रम ठरवताना, कुठेही जाऊया म्हणताना आईचं काय हा यक्षप्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकतो. पण घरात एकटी राहू शकण्याची हिंमत मी गेली कित्येक वर्षं गमावल्ये. त्यामुळे माझाही नाईलाज होतो.

हे सगळं खरं असलं तरी मी मात्र स्वतःला भाग्यवान समजते. माझ्या वडिलांनी मला फायनलपर्यंत शिकवलं, अण्णांनी माझ्यावर विश्वास टाकला आणि माझ्यासारख्या खेडवळ मुलीला शहाणं करून जगात वावरायला आत्मविश्वास दिला. त्यांच्या निधनानंतर माझं आयुष्य जास्तीत जास्त सुखद करण्याचा प्रयत्न माझी मुलं मनापासून करतायत ह्याची मला पूर्ण जाणीव आहे. आणखी काय हवं असतं आयुष्यात!त्याबद्दल मी् परमेश्वराचे आभार तर मानतेच पण त्याहीपेक्षा जास्त माझ्या आयुष्यात आलेले जिवलग कुटुंबीय, नातेवाईक, परिचित, सुहृद आणि हितचिंतक यांच्याबदल मी कायमची ऋणी आहे. या सगळ्या परिवाराने तर माझं आयुष्य कमालीचं तृप्त, समाधानी आणि कृतार्थ केलंय. आणि त्यामुळेच मला हा दिवस बघायला मिळतोय. माझ्या वाढदिवसाच्या दिवशी

भारतातल्या माझ्या माणसांशीही सुभाषने भेट घडवून आणली. माझ्या सगळ्या इच्छा पूर्ण झाल्या आहेत. आज तर एवढी सगळी मंडळी माझ्यासाठी इथे जमल्येत, कोण काय बोलतंय मला काही ऐकू येत नाहीये पण सगळ्यांची आपुलकी आणि प्रेम मला जाणवतंय. माझं मन अगदी काठोकाठ भरून आलंय.

मनापासून धन्यवाद आणि नमस्कार !

**सुमित्रा देवधर**
**(शब्दांकन - वसुंधरा पर्वते)**